जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २०९ | रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### गुलटेकडीत येथे गोळीबार करणारे चौघे जण ताब्यात

**पुणे, ता. २१ :** गुलटेकडीतील मीनाताई ठाकरे वसाहत अल्पवयीनांनी दहशत माजविल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. अल्पवयीनांनी देशी बनावटीच्या पिस्तुलातून गोळीबार केला. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांनी चौघा अल्पवयीनांना ताब्यात घेतले. याबाबत एकाने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुलटेकडीतील मीनाताई ठाकरे वसाहत परिसरात शुक्रवारी (२० फेब्रुवारी) रात्री पावणेअकराच्या सुमारास चौघे अल्पवयीन दुचाकीवरुन आले. आम्ही या भागातील भाई आहोत, येथे आमचीच चालणार. या भागात राहायचे असेल तर हप्ता द्यावा लागेल, असे सांगून अल्पवयीनांनी त्यांच्याकडील पिस्तुल उगारून दहशत माजविली. नागरिकांना शिवीगाळ करुन अल्पवयीनांनी पिस्तुलातून हवेत गोळीबार केला, तसेच अल्पवयीनांनी नागरिकांना शस्त्राचा धाक दाखविला. या घटनेनंतर अल्पवयीन दुचाकीवरुन पसार झाले.

# राज्य सरकारकडून सरपंचांची प्रशासक म्हणून नियुक्ती

## मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींना दिलासा; ग्रामविकास विभागाकडून आदेश जारी

**संतोष मुंडे**

मुंबई, ता. २१ :राज्यातील तब्बल १४ हजार ग्रामपंचायतींची मुदत संपत असताना निर्माण झालेला प्रशासकीय पेच अखेर मार्गी लागला आहे. महाराष्ट्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचे आदेश जारी केले आहेत. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत गावपातळीवरील कारभारात खंड पडू नये आणि प्रशासनात सातत्य राहावे, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

याआधी जानेवारीत काढलेल्या परिपत्रकानुसार २०२६ पर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. ग्रामसेवकांना प्रशासक म्हणून नेमण्याचा प्रस्तावही पुढे आला होता. मात्र राज्यातील ग्रामपंचायतींची प्रचंड संख्या आणि पंचायत समि त्यांमधील विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता हा पर्याय व्यवहार्य ठरणार नसल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, या संदर्भातील निर्णयाला मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने स्थगिती दिल्याने सरकारसमोर नवा पर्याय शोधण्याची गरज निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर सरकारने सुधारित आदेश काढत स्थानिक नेतृत्वावरच जबाबदारी सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या आदेशानुसार, ग्रामपंचायतीची मुदत संपण्याच्या दिवशी जे सरपंच पदावर असतील, त्यांचीच प्रशासक म्हणून नियुक्ती होईल. त्यांच्या कामकाजासाठी विद्यमान उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती स्थापन करण्यात येणार आहे. त्यामुळे निर्णयप्रक्रिया सुरळीत राहण्यास मदत होईल आणि बाहेरील अधिकाऱ्यांना नव्याने कारभार समजावून सांगण्याची गरज भासणार नाही, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



प्रशासक आणि प्रशासकीय समि तीचा कार्यकाळ नियुक्तीपासून सहा महिने किंवा संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक पूर्ण होईपर्यंत, जे आधी होईल तेवढाच मर्यादित असेल. हा पूर्णपणे तात्पुरता उपाय असून निवडणुका पार पडल्यानंतर नव्याने निवडून आलेले प्रतिनिधी कारभार स्वीकारतील.२८ फेब्रुवारीपर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठीच हा निर्णय लागू राहील, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. प्रशासक आणि समिती नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे देण्यात आले आहेत.

ग्रामविकास विभागाचे अप्पर सचिव बाबुराव म्हादू आसोले यांनी याबाबतचे आदेश सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना कळवले आहेत. राज्यातील नगरपालिका, नगरपंचायत, महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांनंतर ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची रणधुमाळी अपेक्षित असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेला हा निर्णय प्रशासनातील अनिश्चितता दूर करणारा मानला जात आहे. गावपातळीवरील कारभारात सातत्य, पारदर्शकता आणि वेग राखण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

निर्णय २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठीच लागू राज्य सरकारने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, घेण्यात आलेला निर्णय २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठीच लागू राहणार आहे. या कालावधीत प्रशासक आणि प्रशासकीय समि ती नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांणा असणार आहेत. तसेच प्रशासक आणि प्रशासकीय समितीचा कालावधी त्यांच्या नेमणुकीपासून ६ महिने किंवा संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक कालावधी पूर्ण होईपर्यंत, दोन्ही पैकी जे आधी पूर्ण होईल तोपर्यंत राहणार आहे. हा निर्णय तात्पुरता उपाय असून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच नियमित निवडून आलेले पदाधिकारी ग्रामपंचायतचा कारभार स्वीकारणार आहेत.



## विषय समित्यांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकांना मुहूर्त मिळाला

**पुणे, ता. २१ :** पुणे महापालिकेची निवडणूक होऊन आणि निकाल जाहीर होऊन एक म हिना पूर्ण झाला आहे. नवीन महापौर म्हणून भाजपने मंजुषा नागपुरे यांना संधी दिली आहे. उपमहापौर पदी परशुराम वाडेकर विराजमान झाले आहे. सभागृह नेते म्हणून गणेश बीडकर यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली असून स्थायी समि तीच्या अध्यक्ष पदासाठी ज्येष्ठ नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.

महापालिकेच्या विषय समित्यांच्या सदस्यांची नियुक्ती देखील करण्यात आली आहे. शहर सुधारणा, विधी, शिक्षण, महिला व बालकल्याण, क्रीडा तसेच नाव समिती या विषय समित्यांच्या अध्यक्ष, उपाध्यक्षपदाची निवडणूक कधी होणार याबाबत उत्सुकता होती. मात्र आता या निवडणुका कधी होणार हे निश्चित करण्यात आले आहे. पुढील आठवड्यात या सर्व विषय समित्यांच्या निवडणुका होणार आहे. शुक्रवारी फेब्रुवारीला या निवडणुका होणार आहे. यासाठीचे अर्ज सोमवारी (२३ फेब्रुवारीला) स्वीकारले जाणार आहेत. दुपारी तीन ते सहा या वेळेत नगरसचिव कार्यालयात हे अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या हातात असलेल्या स्थायी समितीच्या अध्यक्ष पदासाठी सोम वारी (२३ फेब्रुवारीला) निवडणूक होणार आहे. स्थायी समितीसाठी महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाने माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले यांना संधी दिली असून त्यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. स्थायी समितीमध्ये भाजपचे १२ सदस्य असल्याने भिमाले यांचा विजय निश्चित आहे.

# लोणी काळभोर पोलीस यंत्रणेची दिशाभूल करणाऱ्या अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. २१ :** कदमवाकवस्ती (ता. हवेली) परिसरात वेश्याव्यवसाय सुरू असल्याचा बनावट फोन करून पोलीस यंत्रणेची दिशाभूल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वारंवार खोटे कॉल करून लोणी काळभोर पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार अंकुश गणपत घुले यांनी सरकारतर्फे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंकुश घुले हे गुरुवारी (ता.१९) ११२ बीट मार्शल म्हणून कर्तव्य बजावत होते. दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास बीट मार्शलच्या एमडीटी डिव्हाइसवर एक कॉल प्राप्त झाला. इंदिरानगर परिसरात काही मुलींना जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जात असल्याची माहिती कॉलरने दिली. या गंभीर माहितीची दखल घेत पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले व परिसरात सखोल तपासणी व पेट्रोलिंग केले. मात्र दिलेल्या ठिकाणी कोणताही संशयास्पद प्रकार आढळून आला नाही.



दरम्यान, त्याच मोबाईल क्रम ांकावरून पोलिसांना पुन्हा पुन्हा कॉल येत राहिले. प्रत्येक वेळी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली; परंतु प्रत्यक्षात कोणतीही घटना घडलेली नसल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी त्या क्रमांकावर संपर्क साधण्याचा अनेकदा प्रयत्न केला, मात्र संबंधित व्यक्तीने फोन उचलला नाही. विशेष म्हणजे याच क्रमांकावरून एक दिवस आधी म्हणजे १८ फेब्रुवारीलाही अशाच प्रकारचे कॉल करून हॉस्टेल परिसरात कॉलेजच्या मुलींकडून वेश्याव्यवसाय व गांजा विक्री सुरू असल्याची खोटी माहिती देण्यात आली होती. त्यावेळीही पोलिसांनी तपास केला असता ती माहिती पूर्णपणे खोटीअसल्याचे समोर आले.

या प्रकारामुळे लोणी काळभोर पोलिसांची मोठी धावपळ झाली तसेच आपत्कालीन सेवांचा गैरवापर झाल्याचे स्पष्ट झाले आहे. अखेर हा कॉलर जाणीवपूर्वक खोटी माहिती पोलीस प्रशासनाला देत असल्याचे समोर आले. त्यामुळे संबंधित मोबाईल क्रमांकधारक व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २१७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पुणे जिल्हा परिषदेत सत्तास्थापनेचा तिढा; १५ दिवसांनंतरही अध्यक्ष–सभापती निवड रखडली

**लोणी काळभोर, ता. २१ :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल लागून तब्बल पंधरा दिवस उलटले तरी जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष तसेच पंचायत समित्यांच्या सभापती-उपसभापती निवडीच्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात राजकीय अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले असून नव्याने निवडून आलेले सदस्य संभ्रमात पडले आहेत. सत्ता कुणाच्या गळ्यात जाणार? याचीच चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे.

निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सत्तास्थापनेची प्रक्रिया वेगाने होईल, अशी अपेक्षा राजकीय वर्तुळात होती. मात्र पंधरा दिवस उलटूनही अधिकृत हालचाल न झाल्याने तर्क-वितर्कांना अक्षरशः उधाण आले आहे. अध्यक्षपद




कोणाला मिळणार, सभापती पदावर कोणाची वर्णी लागणार आणि नेम का निर्णय कधी होणार, याबाबत जिल्हाभर चर्चा रंगल्या आहेत.

अनेक सदस्यांना पक्षश्रेष्ठींकडून कोणतीही स्पष्ट दिशा मिळत नसल्याची माहिती पुढे येत आहे. त्यामुळे निवडून आलेल्या सदस्यांमध्ये अस्वस्थता वाढली असून काही ठिकाणी गटबाजी आणि पडद्यामागील हालचाली सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात ऐकू येत आहे. काही सदस्यांनी तर निर्णय लवकर घ्या, अन्यथा विकासकामांवर परिणाम होईल, अशी नाराजीही व्यक्त केल्याचे समजते. दरम्यान, जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) स्पष्ट वर्चस्व मिळवले आहे. जिल्हा परिषदेत तब्बल ५१ सदस्य निवडून आले आहेत. त्यामुळे सत्तेचे गणित जवळपास स्पष्ट असले तरी अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीचा अंतिम निर्णय अद्याप जाहीर झालेला नाही. हवेली पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादीचे ६ सदस्य निवडून आले असून सत्तास्थापनेसाठी आणखी एका सदस्याची आवश्यकता असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे येथेही राजकीय हालचाली वेगाने सुरू असल्याची चर्चा आहे.

विशेष म्हणजे ग्रामीण भागातील अनेक महत्त्वाच्या निर्णयांवर आणि विकासकामांवर या विलंबाचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अध्यक्ष आणि सभापती निवड लांबणीवर पडल्याने प्रशासनिक कामकाजातही अनिश्चितता निर्माण झाली असल्याची चर्चा आहे. विरोधकांकडून सत्तेच्या अंतर्गत गणितांमुळेच हा विलंब होत असल्याचा आरोप केला जात आहे. तर दुसरीकडे अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठींकडून घेतला जाणार असल्यानेच घोषणा लांबवली असल्याचे सांगितले जात आहे. मात्र निर्णय जाहीर होईपर्यंत जिल्ह्याच्या राजकारणातील उत्सुकता आणि संभ्रम कायम राहणार, हे मात्र निश्चित.



## उरुळी कांचनच्या उन्नती कन्या विद्यालयात कराटे यलो बेल्ट परीक्षेचा उत्साह

**उरुळी कांचन, ता. २० :** उरुळी कांचन (ता. हवेली) येथील फक्त मुलींची शाळा म्हणून ओळख असलेल्या उन्नती कन्या विद्यालयात नुकतीच कराटे यलो बेल्ट परीक्षा उत्साहात पार पडली.

शाळेच्या कराटे प्रशिक्षिका शितल कांचन यांनी विद्यार्थिनींना तांत्रिक कौशल्य, शिस्त आणि आत्मसंरक्षणाचे धडे दिले. परीक्षेसाठी णड्ध संस्थेचे अध्यक्ष व संचालक रेन्शी संजय स्टेट, राष्ट्रीय सुवर्णपदक विजेत्या रेन्शी आरती मोहित मल्ला तसेच शिशान गणेश अहिरकर पर्यवेक्षक म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ४३ विद्यार्थिनींना यलो बेल्ट प्रदान करण्यात आला.

अध्यक्षा नयॉन सुरेश कांचन, संचालिका डॉ. नुपूर सुरेश कांचन आणि मुख्याध्यापिका पद्मादेवी विडप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात तिसरी ते आठवीच्या विद्यार्थिनींनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. प्रात्यक्षिकांदरम्यान विद्यार्थिनींच्या आत्मविश्वासपूर्ण हालचाली, नेमक्रेपणा आणि जिद्दीने उपस्थितांची मने जिंकली. मुख्याध्यापिका पद्मादेवी विडप यांनी विद्यार्थिनींना भविष्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकण्याचे ध्येय ठेवण्याचे आवाहन केले. दरम्यान, या उपक्रमा मुळे मुलींमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि स्वसंरक्षणाची जाणीव दृढ झाली असून विद्यालयाच्या क्रीडा वाटचालीत हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

# वाघोलीत रंगणार महाराष्ट्र केसरीची स्पर्धा; स्पर्धेच्या नियोजनाबाबत महत्वपूर्ण बैठक संपन्न

**वाघोली, ता. २१ :** महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेचा मानबिंदू असलेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा बिगुल आता वाघोलीत (ता. हवेली) वाजला आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने आणि रामकृष्ण कर्तव्य फाउंडेशन यांच्या पुढाकाराने होणाऱ्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी २०२५-२६ स्पर्धेच्या नियोजनासाठी शुक्रवारी (ता. २०) उत्साहपूर्ण बैठक पार पडली.

वाघोली (ता. हवेली) येथील श्रेयस गार्डन मंगल कार्यालय येथे झालेल्या बैठकीत स्पर्धेच्या भव्य आयोजनाचा आराखडा सादर करण्यात आला. आयोजक रामकृष्ण





अण्णा सातव पाटील यांनी स्पर्धेच्या नियोजनाचे प्राथमिक सादरीकरण करताना विविध समित्यांची स्थापना, जबाबदाऱ्यांचे वाटप, खेळाडूंसाठी निवास-व्यवस्था, सुरक्षा, प्रेक्षक व्यवस्थापन आणि प्रसारमाध्यम समन्वय याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी संदीप सातव, संपत गाडे, सुनील जाधवराव, मेघराज कटके, रामकृष्ण सातव, नवनियुक्त नगरसेवक रामदास दाभाडे, अनिल सातव, राजेंद्र पायगुडे, संजय सातव, दादासाहेब सातव, संदीप सातव, संपत गाडे, कैलास सातव, सुरेश सातव, कमलाकर सातव, नटराज सातव, कुशाल सातव, केतन जाधव, मारुती गाडे, बाळासाहेब सातव, मारुती गाडे, यांसह इतर मान्यवर ग्रामस्थ व विविध क्षेत्रांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कुस्तीप्रेमींची लक्षणीय उपस्थिती बैठकीत होती. बैठकीत उपस्थित मान्यवरांनी सूचना व अभिप्राय म ांडत स्पर्धा ऐतिहासिक करण्याचा निर्धार व्यक्त केला. वाघोलीच्या नावलौकिकात भर घालणारी ही सुवर्णसंधी आहे. महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेला साजेसा भव्य सोहळा उभारू, असा एकमुखी निर्धार व्यक्त झाला.

दरम्यान, महाराष्ट्र केसरीसारख्या प्रतिष्ठेच्या किताबासाठी राज्यभरातील नाम ांकित मल्लांची नजर वाघोलीकडे लागली असून, आगामी दिवसांत स्पर्धेची उलटी गणती सुरू होणार आहे. वाघोलीत रंगणाऱ्या या कुस्तीच्या महायुद्धाकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त



### बार्शी औद्योगिक वसाहतीतील प्लायवूड कारखान्याला आग; जीवितहानी टळली

**बार्शी, ता. २१:** शहरातील औद्योगिक वसाहतीमधील एका प्लायवूड कारखान्याला अचानक भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. आग लागल्यानंतर परिसरात धुराचे प्रचंड लोट उसळल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली. ही घटना बार्शी येथील औद्योगिक वसाहतीत घडली. प्राथमिक माहितीनुसार, कारखान्यातील लाकूड व ज्वलनशील साहित्यामुळे आगीने झपाट्याने फैलाव घेतला. काही वेळातच संपूर्ण परिसर काळ्या धुराने व्यापला गेला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आग आटोक्यात आणण्यासाठी पाण्याचे फवारे मारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. प्रशासनाने तत्काळ परिसर रिकामा करून सुरक्षेची उपाययोजना केली आहे. दरम्यान, सुदैवाने अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही. मात्र, कारखान्याचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. आगीचे नेमकेकारण अद्याप समजू शकले नसून, शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे.

### चहात विषारी रसायन घालून नातवानेच केला आजीचा खून



**कोल्हापूर, ता. २१ :** कोल्हापुरातील गंगावेश परिसरात घडलेली एक धक्कादायक घटना आता उघड झाली आहे. शुक्रतारा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या ७२ वर्षीय उषा मारुती भिऊंगडे यांचा मृत्यू सुरुवातीला संशयास्पद वाटत होता; मात्र तपासाअंती तो खून असल्याचे स्पष्ट झाले. आणि सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे हा खून त्यांच्या चुलत नातवाने प्रेम परशुराम भिऊंगडे (२०) चैनीसाठी केला. उषा यांचे पती मारुती भिऊंगडे यांचे ३० डिसेंबर २०२५ रोजी निधन झाले होते. मूलबाळ नसल्याने त्या एकट्याच राहत होत्या. काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावलेली होती. पुतण्या परशुराम त्यांची देखभाल करत होते. १६ फेब्रुवारीला सकाळी त्या फ्लॅटमध्ये मृतावस्थेत आढळल्या. प्रथमदर्शनी नैसर्गिक मृत्यू वाटला नाही. शेजाऱ्यांच्या माहितीतून आणि सीसीटीव्हीच्या आधारे तपासाची दिशा बदलली.प्रेम त्या सकाळी फ्लॅटवर गेला होता. चौकशीत उघड झाले की, त्याने चहात सोनारकामात वापरली जाणारी विषारी पावडर मिसळून आजीला दिली. विश्वासाने चहा पिल्यानंतर त्यांना अस्वस्थता आली आणि त्या कोसळल्या. मृत्यूची खात्री झाल्यावर प्रेमने दहा तोळ्यांचे दागिने घेऊन पलायन केले. काही दिवसांनी तो ताब्यात आला आणि गुन्ह्याची कबुली दिली.

# लोणी काळभोर येथे माती टाकण्याच्या वादातून दोन कुटुंबामध्ये हाणामारी

## माजी उपसरपंचासह सहा जणांवर परस्परविरोधी गुन्हे दाखल

**लोणी काळभोर, ता. २१ :** सामाईक मोकळ्या जागेत माती टाकण्याच्या किरकोळ कारणावरून दोन नातेवाईक कुटुंबांमध्ये झालेला वाद थेट हाणामारीपर्यंत पोहोचल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) येथील पांढरी रोड परिसरात बुधवारी (ता. १८) सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणात महिलांना मारहाण, दगडाने हल्ला, दागिने तुटणे व ठार मारण्याच्या धमक्या दिल्या आहेत. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दोन्ही बाजूंच्या तक्रारींवरून माजी उपसरपंचासह सहा जणांविरुद्ध परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

सिम्पल गणेश कांबळे (वय ३२, रा. पांढरी रोड, लोणी काळभोर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मिलिंद भास्कर कांबळे व करिष्मा मिलिंद कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर करिष्मा मिलिंद कांबळे (वय ३६) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार माजी उपसरपंच गणेश तात्याराम कांबळे, सुनंदा तात्याराम कांबळे, सिम्पल गणेश कांबळे आणि मोनू गौतम कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या घटनेत करिष्मा मिलिंद कांबळे या घरी असताना त्यांची चुलत सासू सुनंदा कांबळे व सिम्पल कांबळे या त्यांच्या घरी आल्या. सामाईक जागेत माती टाकण्याच्या कारणावरून दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला. हा वाद लगेचच शिवीगाळ आणि मारहाणीपर्यंत गेला. करिष्मा कांबळे यांनी विरोध केल्यावर त्यांना हाताने मारहाण केल्याचा आरोप आहे.

आरडाओरडा ऐकून माजी उपसरपंच गणेश कांबळे घटनास्थळी आले. त्यांनीही शिवीगाळ करत दादागिरी केली. करिष्मा कांबळे घरात गेल्यानंतरही त्यांच्या मागे घरात घुसून त्यांना बाहेर ओढून दगडाने मारहाण केली. या झटापटीत करिष्मा कांबळे यांच्या गळ्यातील सुमारे दहा ग्रॅम वजनाचे मणी मंगळसूत्र तुटून काही भाग गहाळ झाला. त्याचवेळी मोनू कांबळे यांनी ठार मारण्याची धमकी दिली आहे.

दुसऱ्या घटनेत, सिम्पल कांबळे आणि मिलिंद कांबळे व करिष्मा कांबळे यांच्यामध्ये शेजारील बांधकामातून निघालेली माती सामाईक मोकळ्या जागेत टाकण्याच्या कारणावरून आधीपासून वाद सुरू होता. १८ फेब्रुवारी रोजी पुन्हा माती टाकल्याने सुनंदा कांबळे यांनी मिलिंद कांबळे यांना जाब विचारला. त्यावेळी मिलिंद यांनी शिवीगाळ केली व करिष्मा कांबळे यांनी सुनंदा कांबळे यांना मारहाण केली. भांडणाचा आवाज ऐकून सिम्पल कांबळे तेथे गेल्या. तेव्हा त्यांनाही शिवीगाळ करण्यात आली.

त्यानंतर मिलिंद कांबळे यांनी त्यांना पकडून ठेवले आणि करिष्मा कांबळे यांनी दोघींना मारहाण व धक्काबुक्की केली. या झटापटीदरम्यान सिम्पल कांबळे यांच्या गळ्यातील सुमारे एक तोळ्याची सोन्याची चैन तुटून गहाळ झाली आहे. गोंधळ वाढत असताना गणेश कांबळे तेथे आले असता मिलिंद कांबळे यांनी जमिनीवरील दगड उचलून त्यांच्यावर हल्ला केला. परिसरातील नागरिकांनी हस्तक्षेप करून दोन्ही कुटुंबामधील वाद थांबवला. दरम्यान, दोन्ही बाजूंनी तक्रारी दाखल केल्याने लोणी काळभोर पोलिस ठाण्यात एकूण सहा जणांविरुद्ध विविध गंभीर कलमान्वये परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पूजा माळी करत आहेत.

### कात्रज भागात डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**कात्रज, ता. २१ :** भरधाव डंपरच्या धडकेत दुचाकीस्वार महिलेचा मृत्यू झाल्याची घटना पुणे-सातारा रस्त्यावर घडली. या प्रकरणी डंपर चालकाविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला. परिमा हेमंत प्रधान (वय-३८, रा. श्री ज्वेलस सोसायटी, टिळेकरनगर, कात्रज-कोंढवा रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत अभिषक निगडे (वय-३५, रा. कात्रज-कोंढवा रस्ता) यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यत फिर्याद दिली आहे. या प्रकरणी डंपर चालक संजय प्रभाकर जाधव (वय २८, रा. मानकर चौक, ऊरळी देवाची, हडपसर-सासवड रस्ता) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निगडे यांच्या नातेवाईक परिमा प्रधान शुक्रवारी सकाळी पावणेनऊच्या सुम ारास पुणे-सातारा रस्त्यावरुन निघाल्या होत्या. कात्रज चौकातील राजीव गांधी प्राणी संग्रहालयासमोर भरधाव डंपरने दुचाकीला धडक दिली. अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या.

# विधवा महिलेवर बड्या राजकीय नेत्याकडून बलात्कार; एकनाथ खडसेंचा आरोप



**जळगाव, ता. २१ :** एकनाथ खडसे यांनी जळगाव जिल्ह्यातील सावदा पोलीस प्रशासनावर तसेच सत्ताधारी नेत्यांवर अत्यंत गंभीर आरोप करत खळबळ उडवून दिली आहे. सावदा परिसरातील एका विधवा महिलेवर एका वरिष्ठ राजकीय पदाधिकाऱ्याने बलात्कार केल्याचा दावा त्यांनी केला असून, या प्रकरणात पोलीस तक्रार नोंदवण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

खडसे यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित महिला तक्रार नोंदवण्यासाठी सावदा पोलीस ठाण्यात सकाळी गेली होती आणि दुपारी १२ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत ती ठाण्यात थांबली होती. मात्र, पोलीस निरीक्षकांनी तिची तक्रार दाखल करून न घेता तिला धमकावून घरी पाठवले, असा गंभीर आरोप त्यांनी केला. एका मोठ्या राजकीय पदाधिकाऱ्याविरुद्ध बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्याची तक्रार नोंदवली जात नाही, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे, असे खडसे म्हणाले. दरम्यान, सावदा पोलीस ठाण्यात खडसे यांच्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. त्यानंतर त्यांनी पोलीस प्रशासनावर आक्रमक भूमिका घेत टीका केली आहे. संबंधित पोलीस निरीक्षकाला राजकीय संरक्षण मिळत असल्याचा आरोप करत, गुन्हे नोंदवण्याच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात हेराफेरी होत असल्याचा दावा त्यांनी केला. यावेळी खडसे यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचा उल्लेख करत एक छायाचित्र प्रसारमाध्यमांसमोर सादर केले. संबंधित पोलीस अधिकाऱ्याने मंत्र्यांसोबतचे फोटो सोशल मीडियावरील स्टेटसवर ठेवले असल्याचा दाखला देत, अशा माध्यम ातून अधिकाऱ्याला राजकीय वरदहस्त मिळत असल्याचा आरोप त्यांनी केला.

तसेच, संबंधित पोलीस निरीक्षकाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना खडसे म्हणाले की, हा अधिकारी केवळ गुन्हेगारांना पाठीशी घालत नाही, तर दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होईल असे वातावरण तयार करत आहे.

सात-सात तास पोलीस ठाण्यात थांबूनही एका बलात्कार पीडितेला न्याय मिळत नसेल, तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. संपूर्ण घटना पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याची माहिती मला मिळाली असून, त्या फुटेजची मागणी केली आहे. मात्र अद्याप ती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, असेही खडसे यांनी स्पष्ट केले. या आरोपांमुळे जळगाव जिल्ह्यात राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, संबंधित प्रकरणात पोलीस प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांची भूमिका काय राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### लोणी काळभोरमधील व्यापाऱ्याकडून आडत व्यापाऱ्याला ३४ लाखांचा गंडा

**लोणी काळभोर, ता. २१ :** कृषीमालाच्या व्यवहारातून विश्वास संपादन करून तब्बल साडेचौतीस लाख रुपयांना गंडा घातल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) परिसरात घडली आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एका विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माणिक विलास मापारे (रा. टाकळी भीमा, शिक्रापूर, पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी नानासाहेब सुखदेव कौंडुभैरी (वय ५०, रा. मंगळवेढा, जि. सोलापूर) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नानासाहेब कौंडुभैरी हे मार्केटयार्ड येथे आडत भुसार व्यापारी असून शेतकऱ्यांकडून कृषीमाल खरेदी करून तो विविध शहरांतील व्यापाऱ्यांना पुरविण्याचा व्यवसाय करतात. मार्केटयार्ड परिसरातील ब्रोकर प्रकाश लोढा यांच्या ओळखीने माणिक विलास मापारे या व्यापाऱ्याशी त्यांचा संपर्क झाला. ऑक्टोबर २०२४ मध्ये मापारे यांनी तातडीने चार ट्रक मक्याची मागणी केली. त्यानुसार माल लोणी काळभोर येथील गुरुदत्त वजनकाट्यावर पाठविण्यात आला. या पहिल्या व्यवहाराचे सुमारे २२.५० लाख रुपये मापारे यांनी आरटीजीएसद्वारे दिल्याने त्यांच्यावर विश्वास बसला. यानंतर आणखी मक्याची मागणी करण्यात आली. विश्वास संपादन झाल्यानंतर कौंडुभैरी यांनी वेगवेगळ्या तारखांना पाच ट्रक मका लोणी काळभोर येथे माणिक विलास मापारे यांच्याकडे पाठविला. या मालाचे एकूण मूल्य ३४ लाख ६० हजार ९१७ रुपये होते. मात्र हा माल ताब्यात घेतल्यानंतरही त्याचे पैसे देण्यास माणिक विलास मापारे यांनी टाळाटाळ करण्यास सुरुवात केली.

### माजी महापौर अभिषेक कळमकरांवर अत्याचाराचा गुन्हा



**अहिल्यानगर, ता. २१ :** शहरातील कायदा-सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर आणखी एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. माजी महापौर तथा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्याविरोधात २५ वर्षीय तरुणीने अत्याचाराची तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

तक्रारीनुसार, शाळेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत कळमकर यांनी संबंधित तरुणीशी संपर्क वाढवला. नगर शहरातील विविध ठिकाणी तसेच पुणे जिल्ह्यातील शिरूर येथील एका लॉजमध्ये नेऊन अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत नमूद आहे.

याशिवाय मोबाईलवर व्हिडिओ कॉल करून अश्लील कृत्यांस भाग पाडणे, त्याचे चित्रीकरण करून व्हायरल करण्याची धमकी देत ब्लॅकमेल केल्याचेही गंभीर आरोप करण्यात आले आहेत. काही व्हिडिओ पुरावे पोलिसांकडे जमा झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर कळमकर फरार असून पोलिसांनी त्यांचा शोध सुरू केला आहे. या घटनेचे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांत पडसाद उमटले असून महिला सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

दरम्यान, या प्रकरणात पोलिस तपास सुरू असून अधिकृत माहिती येण्याची प्रतीक्षा आहे. आरोपी दोषी ठरलेला नसून न्यायालयीन प्रक्रियेनंतरच सत्य परिस्थिती स्पष्ट होणार आहे.

### एसटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा; फेब्रुवारीच्या पगारासोबत येणार थकीत हप्ता




**मुंबई, ता. २१ :** एसटी महामंडळातील सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचे थकीत हप्ते देण्यासाठी शासन कटिबद्ध असून त्यासाठी १०० कोटी रुपये तातडीने मंजूर करण्यात आले आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. फेब्रुवारी महिन्याच्या वेतनासोबत थकीत हप्ता कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

एसटीकडे निधीअभावी थकीत वेतन देणे शक्य नसल्याने शासनाने हस्तक्षेप करावा, अशी भूमिका यापूर्वी मांडण्यात आली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार डिसेंबरपासून थकीत हप्ते देण्यास सुरुवात झाली. मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे फेब्रुवारीत निधी उपलब्ध न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली.

या पार्श्वभूमीवर काही कामगार संघटनांनी २४ फेब्रुवारीला आंदोलनाचा इशारा दिला होता. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात घेऊन मंत्री सरनाईक यांनी शासनाकडे २१० कोटी रुपयांची मागणी केली. त्यापैकी १०० कोटी रुपये तत्काळ देण्यात आले असून उर्वरित निधीही लवकरच उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. कोणत्याही परिस्थितीत थकीत हप्ते दिले जातील, असा ठाम शब्द त्यांनी दिला.

दरम्यान, सध्या दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या प्रवासात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी संघटनांनी आंदोलन स्थगित करावे, असे आवाहनही त्यांनी केले. एसटी ही राज्यातील लाखो नागरिकांची जीवनवाहिनी असल्याने आर्थिक अडचणींवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे.

### पौड पोलीस ठाण्यातील सहायक फौजदाराला लाच घेताना एसीबीने पकडले




**पुणे, ता. २१ :** पौड पोलिस ठाण्यातील सहाय्यक पोलिस उपनिरीक्षकावर ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ कारवाई करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सायंकाळी सुमारे साडेपाच वाजण्याच्या सुमारास ही कारवाई केली.

सचिन बाळासाहेब शिंदे (वय ४५), सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक, पौड पोलिस ठाणे (पुणे ग्रामीण) असे अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. ते सध्या सुसगाव, ता. मुळशी येथे वास्तव्यास आहेत.तक्रारदार ४५ वर्षीय पुरुष असून त्यांच्या विरोधात पौड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. या गुन्ह्यात जप्त केलेले वाहन परत न करण्यासाठी आणि तपासात मदत करण्याच्या म ोबदल्यात शिंदे यांनी सुरुवातीला १ लाख रुपयांची लाच मागितल्याची तक्रार १८ फेब्रुवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती. पडताळणीदरम्यान १ लाख रुपयांवरून तडजोड करून ३५ हजार रुपये देण्याचे ठरले.

२० फेब्रुवारी रोजी मुळशी बीट कार्यालय, पौड पोलिस ठाणे येथे सापळा रचण्यात आला. तक्रारदाराकडून ३५ हजार रुपये स्वीकारताना शिंदे यांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अंतर्गत गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे आणि अपर पोलिस अधीक्षक अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### निरा भिमा सर्व गाळप झालेल्या ऊसाची बिले देणारा राज्यातील पहिला कारखाना

आदित्य बोराटे



**इंदापूर, ता. २१ :** इंदापूर तालुक्यातील शहाजीनगर येथील नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याकडून सन २०२५-२६ च्या ऊस गळीत हंगामाअखेर गाळप झालेल्या सर्व ऊसाला पहिला हप्ता प्रति टन रु. ३१०१ प्रमाणे शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये शुक्रवारी (दि. २०) जमा करण्यात आला आहे. राज्यात चालू गळीत हंगामात गाळप झालेल्या सर्व ऊसाची बिले शेतकऱ्यांना अदा करणारा नीरा भीमा कारखाना हा बहुधा पहिला कारखाना आहे, अशी माहिती कारखान्याच्या अध्यक्षा सौ.भाग्यश्री हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

नीरा भीमा कारखान्याचे संस्थापक, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याचा चालू सन २०२५-२६ चा गळीत हंगाम दि. ६ फेब्रुवारी अखेर संपन्न झाला. या हंगामामध्ये कारखान्याने ५२५६५७ मे. टन ऊस गाळप पूर्ण केले आहे. या हंगामामध्ये गाळप झालेल्या सर्व ऊस बिलाची रक्कम आज शुक्रवारी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

सदरच्या गाळपाबद्दल संचालक मंडळ, ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी वाहतूक कँत्राटदार, अधिकारी, कर्मचारी वर्ग तसेच हितचिंतक यांचे कारखान्याचे संस्थापक संस्थापक हर्षवर्धन पाटील, अध्यक्षा सौ. भाग्यश्री पाटील, उपाध्यक्ष दादासाहेब घोगरे यांनी अभिनंदन केले आहे. तसेच कारखान्याकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांबरोबर ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार यांची बिलेही नियमितपणे अदा करण्यात आली आहेत.

आगामी सन २०२६-२७ च्या गळीत हंगामामध्ये विक्रमी गाळपासाठी कारखान्याचे संस्थापक हर्षवर्धन पाटील यांचे मार्गदर्शनाखाली आतापासूनच संचालक मंडळाने नियोजन सुरु केले आहे, अशी माहितीही भाग्यश्री पाटील यांनी दिली.

# पळसदेव केंद्रावर दहावीच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत

संतोष पवार



**इंदापूर, ता. २१ :** पळसदेव येथील श्री पळसनाथ विद्यालयात दहावीच्या परीक्षेला उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या परीक्षेस शुक्रवार २० फेब्रुवारीपासून प्रारंभ झाला असून पळसदेव केंद्रावर एकूण २७६ विद्यार्थी प्रविष्ठ झाल्याची माहिती केंद्रसंचालक विकास पाठक यांनी दिली.

परीक्षेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प आणि लेखन साहित्य देऊन स्वागत करण्यात आले. या आगळ्या-वेगळ्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांम ध्ये आत्मविश्वास आणि सकारात्म कता दिसून आली. पळसनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पळसदेव, प्रगती विद्यालय लोणी देवकर, श्री शिवाजी विद्यालय वरकुटे बुद्रुक, काळभैरवनाथ विद्यालय कळाशी आणि नूतन म ाध्यमिक विद्यालय कौठळी या पाच शाळांतील विद्यार्थी या केंद्रावर परीक्षेस बसले आहेत.

यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना पळसनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष भूषण काळे म्हणाले, शिक्षण हे केवळ गुण मिळविण्यासाठी नसून ज्ञानवृद्धी आणि व्यक्तिमत्व विकासासाठी महत्त्वाचे आहे. आत्मविश्वासाने, प्रामाणिकपणे आणि कोणत्याही भीतीशिवाय परीक्षा द्यावी. भयमुक्त, कॉपीमुक्त परीक्षा ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा.

दहावीची परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असल्याने वेळेचे योग्य नियोजन करून ताणतणाव न घेता परीक्षेला सामोरे जाण्याचे आवाहनही करण्यात आले. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा, दक्षता समिती, पोलिस बंदोबस्त, बैठे व भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या प्रसंगी सचिव योगीराज काळे, संचालक बबन काळे, संजय शेलार, देविदास बांडे, उपकेंद्र संचालक लहु जाडकर, राजेंद्र सोनवणे, भारत शेंडगे, पर्यवेक्षक संजय जाधव, संतोष पवार, नितीन जगदाळे, सुरेश बनकर, कांतीलाल जाधव, तानाजी इरकल यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, पळसदेव केंद्रावर सकारात्मक, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात परीक्षेची सुरुवात झाल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

# अद्वैय हिरे मूळ फिर्यादी, त्यांनी खोटी माहिती दिली : संजय राऊत

**मालेगाव, ता. २१ :** अद्वैय हिरे हे मूळ फिर्यादी असून त्यांनी खोटी माहिती दिली, अशी प्रतिक्रिया शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी दादा भुसे प्रकरणावर दिली. गिरणा सहकारी साखर कारखाना प्रकरणात ते शनिवारी मालेगाव कोर्टात हजर राहिले. यावेळी दादा भुसे यांनीही चुकीच्या माहितीच्या आधारे संजय राऊत यांनी आरोप केले असे म्हणत हा खटला मागे घेतला. त्यानंतर दोघांनी कोर्टाबाहेर माध्यमांशी संवाद साधला.



यावेळी संजय राऊत म्हणाले की, ज्यांच्यामुळे हा विषय निर्माण झाला ते आमच्या पक्षात राहिलेले नाही. तेही सत्ता पक्षात गेलेले आहेत. गिरणा सहकारी साखर कारखानाबाबतचे वक्तव्य मुळात ज्या आधारावर मी केले होते, तो आधार ज्यांनी निर्माण केला त्यांनी त्या संदर्भात पाहावे. चुकीच्या आधारावर मी वक्तव्य केल्याचे मला नंतर लक्षात आले. ज्यांनी हे समोर आणले ते आता स्वतः:च दूर गेलेले आहेत. त्यामुळे मी या विषयावर दादा भुसे यांच्याशी का भांडू. ज्यांना भांडायचे असेल ते भांडतील.

अद्वैय हिरे यांनी मला माहिती दिली होती आणि आता ते सत्ता पक्षात गेले आहेत. दादा भुसे स्वत: मंत्री असून आम्हाला हा विषय संपवायचा आहे. जेव्हा हे प्रकरण समोर आले तेव्हा हा कारखाना अद्याप उभा का राहिला नाही एवढीच माझी भूमिका होती. परंतु त्या संदर्भात मी नंतर माहिती घेतली. दादा भुसे यांच्याकडूनही माहिती आली. आता या विषयावर फार चर्चा करू नये, असे संजय राऊत म्हणाले.

# हडपसर–यवत मार्गावर दुहेरी कसरत; पुलांसाठी सरकारचा मास्टरप्लान तयार

**पुणे, ता. २१ :** पुणे शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीला दिलासा देण्यासाठी महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांना प्रशासनाने वेग दिला आहे. बहुचर्चित पुणे रिंग रोड प्रकल्पाचा पूर्व भाग २०२८ पर्यंत, तर पश्चिम भाग २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. पूर्व भागातील १२ पैकी ९ पॅकेजेसची कामे सुरू झाली असून उर्वरित ३ पॅकेजेस प्रशासकीय मान्यतेच्या टप्प्यात आहेत. या पॅकेजेसची निविदा प्रक्रिया मे पूर्वी पूर्ण करून ऑक्टोबरपासून प्रत्यक्ष काम सुरू करण्याचा प्रस्ताव आहे.



दरम्यान, हडपसर ते यवत उन्नत मार्गाच्या प्रस्तावामुळे सोलापूर रस्त्यावरील काही विद्यमान उड्डाणपुलांवर हातोडा पडण्याची शक्यता व्यक्त होत आहे. गाडीतळ आणि नोबेल हॉस्पिटल परिसरातील उड्डाणपूल हटवावे लागू शकतात, अशी माहिती सूत्रांनी दिली. उन्नत मार्गाचे रॅम्प या चौकांवर उतरविल्यास वाहतूक अधिक सुरळीत होईल, असा प्रशासनाचा युक्तिवाद आहे.

हडपसरलोणी काळभोर मेट्रो मार्ग आणि हडपसरयवत उन्नत मार्ग हे एकत्रितपणे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उन्नत मार्गाच्या वर मेट्रो धावणार असल्याने दुहेरी पूल उभारणीची जबाबदारी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) कडे सोपविण्यात आली आहे. हा मार्ग भैरोबा नाल्यापासून सुरू होणार असून, यापूर्वी मेट्रोसाठी उड्डाणपूल पाडण्याचा निर्णय ज्या पद्धतीने घेण्यात आला होता, त्याच धर्तीवर सोलापूर रोडवरील पुलांबाबत पर्याय तपासले जात आहेत.

मात्र, सोलापूर रस्त्यावर आधीच मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ आहे. अशा परिस्थितीत विद्यमान पूल पाडून नव्याने उभारणी करणे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान ठरणार आहे. वाहतूक विस्कळीत न होता प्रकल्प पूर्ण करणे, पर्यायी मार्गांची प्रभावी आखणी आणि नागरिकांना कमीत कमी त्रास देणे ही खरी कसोटी असणार आहे.

दरम्यान, रिंग रोड आणि उन्नत मार्ग पूर्णत्वास गेल्यास पुणेकरांना वाहतूक कोंडीपासून मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे; मात्र त्या दिशेने जाणारा प्रवास आव्हानांनी भरलेला असणार, हेही तितकेच स्पष्ट आहे.

# कुरकुंभजवळ दुहेरी हत्याकांडातील आरोपीची निर्घृण हत्या; पाटस परिसरात भीतीचे वातावरण

**दौंड, ता. २१ :** दौंड तालुक्यातील पाटस परिसरात पाच वर्षांपूर्वी घडलेल्या दुहेरी हत्याकांडाची सावली पुन्हा गडद झाली आहे. २०२१ मधील रक्तरंजित घटनेतील एका आरोपीची शुक्रवारी रात्री पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कुरकुंभजवळ निर्घृण हत्या करण्यात आली. या थरारक घटनेमुळे पाटस व परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



महेश उर्फ मन्या संजय भागवत (वय-२९, रा. पाटस, ता. दौंड) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. या प्रकरणी महेश मारुती टुले यांनी दौंड पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी आनंद माकर, विकी शितकल, संतोष शितकल (रा. आंबिकानगर, पाटस) तसेच अन्य दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध खून व जीवघेण्या हल्ल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (ता. २०) रात्री सुमारे सव्वा आठ वाजण्याच्या सुम ारास भागवत आपल्या साथीदारांसह दुचाकीवरून पाटसकडे परतत होता. मुकदमवाडीउड्डाणपुलावरपोहोचताच पाठीमागून आलेल्या पिकअप वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक्त ते खाली कोसळताच हल्लेखोरांनी कोयता व सत्तूरसारख्या धारदार शस्त्रांनी सपासप वार केले. गंभीर जखमी झालेल्या भागवतचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हल्लेखोर अंधाराचा फायदा घेत पसार झाले. या घटनेचा पुढील तपास दौंड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार हे करीत आहेत.

दरम्यान, ४ जुलै २०२१ रोजी पाटस येथील तामखडा परिसरात शिवम शितकल आणि गणेश माकर या दोन तरुणांची निर्घृण हत्या झाली होती. त्या दुहेरी हत्याकांडात महेश उर्फ मन्या भागवत याच्यासह काही जणांवर यवत पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला होता. संबंधित आरोपी सध्या जामिनावर बाहेर होते.

कुरकुंभजवळ झालेल्या या हल्ल्यात जुन्या प्रकरणातील तिघांना लक्ष्य करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यापैकी भागवतचा मृत्यू झाला असून उर्वरित दोघे जखमी असल्याचे समजते. त्यामुळे २०२१ च्या दुहेरी हत्याकांडाचा सूड उगवला गेला का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. घटनेनंतर पाटस व परिसरात पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संशयितांच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली असून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# नागरी हवाई वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांनी राजीनामा द्यावा; रोहित पवार यांची मागणी

**पुणे, ता. २१ :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार आणि दिवंगत अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार यांनी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांच्या राजीनाम्याची मागणी केली. याबाबत आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिणार असल्याचे रोहित पवार म्हणाले. शनिवारी रोहित पवार यांनी शरद पवार यांच्या दिल्लीतील निवासस्थानी पत्रकार परिषद घेत व्हीएसआर कँपनीबाबतही अनेक धक्कादायक दावे केले. यावेळी त्यांनी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री रामम ोहन नायडू यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली.



अजितदादांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रातील लोक प्रयत्न करत आहेत. पण तपासाला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हेच न्याय देऊ शकतात. कारण यात सहभागी लोक पॉवरफुल आहेत, असे रोहित पवार म्हणाले. तसेच व्हीएसआर कंपनीबाबत अनेक तक्रारी असून विमानतळावरील सीसीटीव्हीची मागणीही फेटाळून लावण्यात आली आहे. या कँपनीला काही प्रभावशाली लोकांचा पाठींबा आहे. विमानात जाणीवपूर्वक इंधनाचा मोठा साठा ठेवण्यात आला होता, असा आरोपही रोहित पवारांनी यावेळी केला.

ते पुढे म्हणाले की, आमच्या पातळीवर आम्ही माहिती काढण्याचा प्रयत्न करत आहोत. अजितदादांवर प्रेम करणारे जे लोक आहेत, त्यांनी विमानतळावरील सीसीटीव्हीबद्दल माहिती मागितली होती, पण ती देण्यात आली नाही. तपासकर्त्यांकडे ती माहिती आहे की नाही हे माहित नाही. सीआयडीने एकही रिपोर्ट दिलेला नाही. सरकारच्या माध्यम ातून माहिती मिळालेली नाही. माहिती आमच्या लोकांना मिळत नाही. पण भाजप पुरस्कृत ट्रोलर्सना एअरपोर्ट ऑथोरिटीच्या माध्यमातून सहज मिळत आहे.

ते पुढे म्हणाले की, आमच्या पातळीवर आम्ही माहिती काढण्याचा प्रयत्न करत आहोत. अजितदादांवर प्रेम करणारे जे लोक आहेत, त्यांनी विमानतळावरील सीसीटीव्हीबद्दल माहिती मागितली होती, पण ती देण्यात आली नाही. तपासकर्त्यांकडे ती माहिती आहे की नाही हे माहित नाही. सीआयडीने एकही रिपोर्ट दिलेला नाही. सरकारच्या माध्यम ातून माहिती मिळालेली नाही. माहिती आमच्या लोकांना मिळत नाही. पण भाजप पुरस्कृत ट्रोलर्सना एअरपोर्ट ऑथोरिटीच्या माध्यमातून सहज मिळत आहे.







Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

## प्राईम लाईफ



### उन्हाळ्यात कलिंगड खाण्याचे अगणित फायदे

**पुणे, ता. २१ :** उन्हाळा सुरु झाल्यावर आपल्या शरीरातील पाण्याचे प्रमाण खूप कमी होते. अशा वातावरणात आपल्या आहारामध्ये रसदार फळांचा समावेश करणे खूप गरजेचे असते. रसदार फळांमध्ये कलिंगड देखील आहे. उन्हाळ्यामध्ये कलिंगड खाणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. कलिंगडामध्ये सुमारे ९०-९२ टक्के पाणी असते, त्यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता भरून निघते आणि डिहायड्रेशन टाळण्यास मदत होते. उष्ण हवामानामुळे होणारा थकवा, चक्कर येणे किंवा अशक्तपणा कमी करण्यासाठी कलिंगड उपयुक्त आहे.

कलिंगडामध्ये जीवनसत्त्व अ आणि क भरपूर प्रमाणात असतात. जीवनसत्त्व क रोगप्रतिकारशक्ती वाढवते, तर जीवनसत्त्व अ डोळ्यांच्या आरोग्यासाठी आणि त्वचेच्या तजेल्यासाठी उपयुक्त आहे. त्यात लाइकोपीन नावाचे अँटीऑक्सिडंट असते, जे हृदयाचे आरोग्य सुधारण्यास आणि शरीरातील हानिकारक घटकांपासून संरक्षण करण्यास मदत करते.

उन्हाळ्यात पचनक्रिया बिघडण्याची शक्यता असते. कलिंगडातील फायबर पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता कमी करते. तसेच ते कमी कॅलरीयुक्त असल्यामुळे वजन नियंत्रणासाठीही चांगले आहे.

कलिंगड शरीराला नैसर्गिक थंडावा देते आणि ताजेतवाने ठेवते. त्यामुळे उन्हाळ्यात दररोज योग्य प्रमाणात कलिंगड खाल्ल्यास शरीर निरोगी आणि ऊर्जावान राहण्यास मदत होते.

वजन कमी करू इच्छिणाऱ्या लोकांसाठीही कलिंगड चांगले आहे, कारण त्यात कॅलरीज कमी आणि पाणी जास्त असते. पचनक्रिया सुधारण्यासाठीही ते उपयुक्त ठरते. नियमित प्रमाणात कलिंगड खाल्ल्यास शरीर ताजेतवाने राहते आणि उष्णतेपासून संरक्षण मिळते. त्यामुळे उन्हाळ्यात कलिंगडाचा आहारात समावेश करणे आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक आहे.

# 'बारकोड'ने फोडला बनावट चारित्र्य प्रमाणपत्राचा खेळ; सीएससी केंद्रचालकासह दोघांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. २१ :** रिक्षा परमिट/बॅच मिळवण्यासाठी बनावट पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र तयार करून शासनाची दिशाभूल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील घोरपडे वस्ती परिसरात घडली असून बार कोडने या फसवणुकीचा भांडाफोड झाला आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मैनुद्दीन हुसेन सय्यद (वय ५४, रा. घोरपडे वस्ती, कदमवाकवस्ती, लोणी काळभोर) व सचिन हरिभाऊ मगर असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी सहायक फौजदार रामदास शंकर मेमाणे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामदार मेमाणे हे मागील आठ महिन्यांपासून पोलीस चारित्र्य पडताळणी विभागात कार्यरत असून ऑनलाईन पोर्टलवरून येणाऱ्या अर्जांची चौकशी करून त्याबाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करतात. दरम्यान, १६ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे शहर विशेष शाखेकडून आलेल्या पत्रानुसार एका संशयास्पद पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले. संबंधित प्रमाणपत्रावर नमूद असलेला बारकोड क्रमांक संशयास्पद आढळला. तपासणी केली असता मूळ प्रमाणपत्रातील




बारकोड विशिष्ट स्वरूपाचा असतो, मात्र सादर केलेल्या प्रमाणपत्रातील बारकोड वेगळ्या पद्धतीचा असल्याने ते बनावट असल्याचे स्पष्ट झाले.

याप्रकरणी चौकशी केली असता, मैनुद्दीन सय्यद यांनी यापूर्वी पोलीस चारित्र्य पडताळणीसाठी ऑनलाईन अर्ज केला होता. मात्र त्यांनी राहत्या पत्त्याचा वैध पुरावा सादर न केल्याने त्यांचा अर्ज पोलीस ठाण्याकडून नामंजूर करण्यात आला होता. त्यामुळे त्यांना अधिकृत प्रमाणपत्र देण्यात आले नव्हते. तरीही सय्यद यांनी बनावट प्रमाणपत्र तयार करून ते रिक्षा परमिट/बॅच मिळवण्यासाठी वाहतूक शाखेकडे सादर केल्याचे तपासात निष्पन्न झाले. पुढील चौकशीत हे प्रमाणपत्र घोरपडे वस्ती येथील समृद्धी एंटरप्रायजेस (सीएससी) या केंद्रातून तयार करून दिल्याचे समोर आले. या केंद्राचा मालक सचिन हरिभाऊ मगर याने बेकायदेशीररित्या बनावट प्रमाणपत्र तयार करून दिल्याचेही उघड झाले.

या प्रकारामुळे सरकारी यंत्रणेची फसवणूक करण्याचा प्रयत्न झाल्याचे स्पष्ट झाले असून दोघांविरुद्ध लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच, लोणी काळभोर पोलिसांनी आरोपी सचिन मगर याला अटक केली आहे. अटक केल्यानंतर आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपीला ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ही उल्लेखनीय कामगिरी लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर, पोलीस उपनिरीक्षक अनिल जाधव, सहाय्यक फौजदार रामदास मेमाणे, पोलीस हवालदार रामहरी वणवे, सागर जगदाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

# ईव्हीएम हॅकिंगचे पुरावे कोर्टाला देणार, हिंमत असेल तर दावा ठोका

## राष्ट्रवादीचे आमदार शेळके यांचा भाजपला इशारा

**पुणे, ता. २१ :** नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाने इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन्स (ईव्हीएम) हॅक केल्या होत्या असा आरोप खुद्द सत्ताधारी पक्षाच्या अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांनी केला होता. त्यावरून भाजपने त्यांच्याविरोधात अब्रुनुकसानीचा दावा ठोकण्याचा इशारा दिला आहे. शेळके यांनीही त्याला प्रत्युत्तर दिले आहे. भाजपवाल्यांनी हिंमत असेल तर आपल्याविरुद्ध दावा ठोकावा, त्यानंतर मी कोर्टात पुरावे सादर करेल, असे आव्हानच शेळके यांनी दिले आहे.

सुनील शेळके यांनी आज प्रसार माध्यमांशी बोलताना स्थानिक भाजप नेत्यांवर निशाणा साधला. ते म्हणाले



की, भाजपवाल्यांना खरोखरच अब्रू असेल तर त्यांनी माझ्यावर आठ दिवसांत अब्रुनुकसानीचा दावा ठोकावा. त्यानंतर कोर्टाकडून मला समन्स येईल तेव्हा मी पुरावे कोर्टात सादर करेन. तत्पूर्वी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात मी लेखी स्वरूपात तक्रार देणार आणि विधिमंडळ अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनाही पुरावे देणार आहे.

भाजपच्या स्थानिक नेतृत्वाने नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीत जे उमेदवार उभे केले होते त्यातील काही उमेदवारांकडून २५ लाख तर काहींकडून ३५ लाख रुपये घेतल्याची माहिती आहे असे वक्तव्य आपण केले होते. निवडणुकीत भाजपचे जे उमेदवार पराभूत झाले त्यांच्या नातेवाईकांनी आणि सहकाऱ्यांनीच ती माहिती आपल्याला पुराव्यानिशी दिली होती, कुणी भविष्यवेत्त्याने वा हॅकरने दिली नव्हती, असे शेळके म्हणाले. कुणाच्या खात्यावर किती तारखेला पैसे दिले आणि कोण लोक ईव्हीएम हॅक करतात त्यांची माहिती त्यांनी दिली, असा दावाही शेळके यांनी केला.


**ईव्हीएम हॅकर पुणे जिल्ह्यात**

ईव्हीएम हॅकर पुण्यातील मावळ आणि खेड तालुक्यात आहेत. मावळमधील काही स्वयंघोषित नेते रॅकेटवाल्या टोळीला भेटले. निवडून आला नाहीत तर पैसे परत देऊ अशी डील त्यांच्यात झाली. आपल्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल करतो म्हणणारेच त्यामध्ये आहेत, असे आमदार शेळके म्हणाले.

# लोणी स्टेशन चौकात भरधाव कारने महिलेला उडवले

**लोणी काळभोर, ता. २१ :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून भरधाव वेगाने चाललेल्या कारणे रस्ता ओलांडणाऱ्या महिलेला धडक दिल्याची घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्राम पंचायत हद्दीतील लोणी स्टेशन परिसरात गुरुवारी (ता.१९) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या अपघातात महिला गंभीर जखमी झाली आहे. तर चालकाच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेखा प्रकाश दवे असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. तर अभिषेक महादेव कांबळे (रा. लोणी काळभोर, ता. हवेली) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या चालकाचे नाव आहे. याप्रकरणी सुलोचना प्रकाश दवे (वय २३, रा. विमल निवास, लोणी स्टेशनजवळ, कदमवाकवस्ती) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दवे कुटुंबाचे लोणी स्टेशन परिसरात पूजा साहित्याचे दुकान आहे. सुलोचना दवे व त्यांची आई रेखा दवे या दोघी नवीन कपडे खरेदी करण्यासाठी कदमवाकवस्ती येथील लोणी स्टेशन परिसरात आल्या होत्या. त्यावेळी त्या पुणेसोलापूर महामार्ग पायी ओलांडत असताना हडपसरकडून सोलापूरच्या दिशेने भरधाव वेगात येणाऱ्या किया कंपनीच्या कारने रेखा दवे यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरात होती की त्या रस्त्यावर कोसळून बेशुद्ध झाल्या. अपघातानंतर परिसरातील नागरिक तातडीने मदतीला धावले. त्यांनी जखमी रेखा दवे यांना रस्त्याच्या बाजूला हलवून संबंधित कारही थांबवली. नागरिकांच्या मदतीने जखमी रेखा दवे यांना तातडीने रिक्षातून विश्वराज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.



# हडपसरमध्ये मजुरांच्या वसाहतीत आग; १९ झोपड्या जळून खाक

हडपसर, ता. २१ : हडपसर भागातील राममनोहर लोहिया उद्यानाजवळ असलेल्या मजुरांच्या वसाहतीत शनिवारी मध्यरात्री आग लागली. आगीत १९ झोपड्या, तसेच तीन दुचाकी जळून खाक झाल्या आहेत. आग लागल्यानंतर मजूर, तसेच कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. आगीमागचे कारण समजू शकले नाही. पुणे-सोलापूर रस्त्यावर राममनोहर लोहिया उद्याना आहे. उद्यानाच्या मागील बाजूस मजुरांची वसाहत आहे. मध्यरात्री अडीचच्या सुमारास वसाहतीतील एका झोपडीला आग लागली. झोपड्या तात्पुरत्या स्वरुपात बांबू आणि पत्र्याचा वापर करुन बांधण्यात आल्या आहेत. गृहोपयोगी साहित्याने पेट घेतल्यानंतर आग भडकली.

आग भडकल्यानंतर शेजारी असलेल्या झोपड्यांनी पेट घेतला. आग लागताच वसाहतीतील मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पाच बंब, टँकर घटनास्थळी दाखल झाले. आग भढकल्याने जवानांनी चहुबाजूंनी पाण्याचा मारा सुरू केला. दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. आगीत १९ झोपड्या भस्मसात झाल्या, तसेच तीन दुचाकीही जळल्या. आगीत कपडे, धान्य, तसेच अन्य साहित्य जळाले. मध्यरात्री आग लागल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती.

दरम्यान, राखून मजूर आणि कुटुंबीय बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन अधिकारी प्रमोद सोनवणे, विलास दडस यांच्या मार्गदर्शनाखाली फायरमन सोमनाथ आबा मोटे, वाहनचालक उत्कर्ष टिळेकर, फायरमन अमोल शिरसाट, ज्ञानदेव अडागळे, रोहित कांबळे, मंगेश गोंधळे या जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली.

# सासवड येथे डॉक्टरला ५ लाखांची खंडणी मागत मारहाण; आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**सासवड, ता. २१ :** ग्रामपंचायत राजकारणाच्या वादातून सासवड (ता. पुरंदर) येथील डॉक्टरांना मारहाण करून ५ लाख रुपयांची खंडणी मागितल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात खळबळ उडाली आहे. बुधवारी (१८) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास सासवड हद्दीतील दत्तात्रय भोंगळे यांच्या बंगल्याजवळ ही घटना घडली.

सुभाष दत्तात्रय शिवतारे (वय ३६, व्यवसाय डॉक्टर (जनहीतार्थ मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल कोडीत नाका सासवड हीवरे रोड) रा. सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे) असे मारहाण झालेल्या डॉक्टरांचे नाव आहे. यांप्रकरणी त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार महेश मारूती राऊत, स्वप्नील सुधाकर राऊत, लोकेश महेश राऊत, अमोल नामदेव पवार, अदित्य सुनील राऊत, सचिन सुधाकर राऊत, जितेंद्र मारूती राऊत, ओम जितेंद्र राऊत सर्व रा. सुपे खुर्द ता पुरंदर) ८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी डॉक्टर सुभाष शिवतारे हे सासवड हद्दीत दत्तात्रय भोंगळे यांच्या बंगल्याजवळून निघाले होते. यावेळी महेश राऊत हे समोरून त्यांच्या दुचाकी गाडीवरून येवुन डॉक्टरजवळ थांबले व तु माझ्या गावातील ग्रामपंचायत राजकारणाबाबत मी सांगीतलेले ऐकत नाही. तुझे करीअर खराब करतो मी दिलेला अर्ज पाठीमागे घ्यायचा असेल तर पाच लाख रूपये दे असे म्हणून खंडणी मागीतली. तसेच शिवीगाळ करून दगड मारून रस्त्यात पडलेल्या काठीने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी भांडणे सोडवण्यासाठी शुभम जाधव व आकाश जाधव दोघे (रा सुपे ता. पुरंदर) हे आले असता त्यांना ही शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी व दगडाने मारहाण केली त्यानंतर पोलीस स्टेशन कडे निघाले असताना भोंगळे वस्ती या ठिकाणी पाठीमागुन मोटार सायकल वरती स्वप्नील राऊत व लोकेश राऊत हे आले. यावेळी लोकेश याने आकाश जाधव याला तुम्ही भांडणात का पडला असे म्हणुन हातातील काठीणे मारहाण केली. दरम्यान, जखमींनी उपचारासाठी रुग्णालय गाठले असता त्या ठिकाणी अमोल पवार, लोकेश राऊत, अदित्य राऊत, सचिन राऊत, जितेंद्र राऊत, ओम राऊत हे आले व त्यांनी शुभम जाधव व आकाश जाधव यांना शिवीगाळ दमदाटी हाताणे व लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# लोहमार्ग पोलीस भरती दरम्यान सांगलीच्या तरुणाचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर, ता. २१ :** छत्रपती संभाजीनगरमध्ये सुरू असलेल्या लोहमार्ग पोलीस भरती प्रक्रियेला शनिवारी एका दुर्दैवी घटनेने गालबोट लागले. मैदानी चाचणी सुरू असताना सांगली जिल्ह्यातील एका २३ वर्षीय उमेदवाराचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला.



सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील मोराळे येथील संग्राम धोंडीराम शिंदे (वय २३) हा तरुण पोलीस भरतीसाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये आला होता. टीव्ही सेंटर भागातील गोकुळ मैदानावर शनिवारी सकाळी लोहमार्ग पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू होती.

मैदानी चाचणीसाठी मैदानात उतरल्यानंतर काही वेळातच संग्राम ला अचानक चक्कर आली आणि तो जमिनीवर कोसळला. उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यांनी वेळ न घालवता त्याला रुग्णवाहिकेतून शासकीय घाटी रुग्णालयात हलवले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी अंती त्याला मृत घोषित केले. हृदयविकाराच्या झटक्याने त्याचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक स्तरावर सांगण्यात येत आहे.

आपल्या खांद्यावर खाकी वर्दी असावी, हे स्वप्न उराशी बाळगून संग्रामने सांगली ते छत्रपती संभाजीनगर असा सुमारे ४५० किलोमीटरचा प्रवास केला होता. अत्यंत जिद्दीने तो या भरतीसाठी सराव करत होता. मात्र, प्रत्यक्ष मैदानात उतरल्यावर नियतीने त्याच्यावर घाला घातला आणि एका होतकरू तरुणाचे पोलीस होण्याचे स्वप्न कायमचे अधुरे राहिले. या घटनेनंतर सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# पुण्यातील एकाला बलात्कार व पोक्सो प्रकरणात उच्च न्यायालयाकडून जामीन

**पुणे, ता. २१:** शिरगाव-परंद्वादी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या बलात्कार व पोक्सो प्रकरणातील नाम ंकित महाविद्यालयातील २० वर्षीय विद्यार्थ्याला मुंबई उच्च न्यायालयाने अटी व शर्थींवर जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती शिवकुमार दिघे यांच्या खंडपीठाने आरोपीस अटी व शर्थींवर जामीन मंजूर करण्याचे आदेश दिले. रुद्रा अरुण वाघाये असे जामीन मंजूर झालेल्या आरोपीचे नाव आहे. अशी माहिती आरोपीचे वकील ॲड. नितीन भालेराव यांनी दिली.



मिळालेल्या माहितीनुसार, १८ जून २०२४ रोजी शिरगाव-परंद्वादी पोलीस ठाणे येथे फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध पीडितेवर बलात्कार करून ती गर्भवती राहिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली होती. पुढे त्याची रवानगी येरवडा कारागृह येथे करण्यात आली होती.

आरोपी कारागृहात असताना त्याच्या वतीने ॲड. नितीन भालेराव यांनी उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. सुनावणीदरम्यान ॲड. विपुल दुशिंग यांनी आरोपीतर्फे युक्तिवाद करत, आरोपी व पीडित एकाच म हाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्यांच्यात प्रेमसंबंध होते, असा दावा केला. तसेच आरोपी मागील एक वर्षांपासून न्यायबंदी असून अद्याप खटल्याची सुनावणी सुरू झालेली नाही, असेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. दरम्यान, दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्यायमूर्ती शिवकुमार दिघे यांच्या खंडपीठाने आरोपीस अटी व शर्थींवर जामीन मंजूर करण्याचे आदेश दिले. या प्रकरणात ॲड. तन्मय काटे व ॲड. अश्रफ काझी यांनीही सहाय्य केले.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे तीन वेळा गावी येऊन गेला

## धनंजय देशमुख यांचा खळबळजनक दावा

**बीड, ता. २१ :** बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. बीड जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात झालेल्या सुनावणीत नव्या दाव्यांमुळे वातावरण तापले असून पीडित कुटुंबाने आरोपींविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे.

सुनावणीनंतर माध्यमांशी बोलताना दिवंगत सरपंचांचे बंधू धनंजय देशमुख यांनी गंभीर आरोप केला की फरार आरोपी कृष्णा आंधळे हा तीन वेळा गावी येऊन गेला असून याची माहिती त्यांनी सीआयडीला दिली आहे. तो मोबाईलचा वापर करत नसल्याने त्याचा मागोवा घेणे कठीण झाले आहे. मात्र त्याला तात्काळ अटक करणे आवश्यक आहे. आमच्या कुटुंबाला त्याच्यापासून धोका आहे, असे त्यांनी सांगितले. दीड वर्ष उलटूनही न्याय



मिळालेला नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, आरोपी वाल्मिक कराड यांच्या जामीन अर्जावर २६ तारखेला सर्वो च्च न्यायालय येथे सुनावणी होणार आहे. याबाबत कॅव्हेट दाखल करण्यात आले असून न्यायालयात आपली बाजू ठामपणे मांडणार असल्याचे देशमुख यांनी स्पष्ट केले.

फेब्रुवारी रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने सरकारी पक्षाला सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या सूचना दिल्या. आरोपी क्रम ांक ते यांनी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची नियुक्ती बदलण्याबाबत केलेल्या अर्जावर सरकारी पक्ष लेखी उत्तर सादर करणार आहे. विष्णू चाटेच्या जेल बदली अर्जावर आदेश येण्याची शक्यता असून आरोपी जयराम चाटेने नवीन वकील एम. के. वाघीरकर यांची नियुक्ती केली आहे.

लॅपटॉपची क्लोन कॉपी, फॉरेन्सिक अहवाल व पेन ड्राईव्ह संदर्भातील माहिती अद्याप उपलब्ध नसल्याचा दावा करत आरोपींच्या वकिलांनी साक्षीदार यादी स्वीकारू नये, अशी मागणी केली. तसेच सरकारी पक्षावर घाईगडबडीचा आरोपही करण्यात आला.

फरार आरोपी, तांत्रिक पुरावे आणि न्यायालयीन लढाईमुळे हे खून प्रकरण अद्यापही जिल्ह्यातील सर्वाधिक चर्चे चा विषय ठरले आहे. पुढील सुनावणी मार्च रोजी होणार असून न्यायप्रक्रियेतील पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.